दै. अंबरनाथ जनमत

२३.७.२०२४

# संदेश नामदे रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ इंस्ट्रीयल एरियाचे नवे अध्यक्ष




अंबरनाथ, दि. २२:- रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ इंस्ट्रीयल एरियाच्या अध्यक्षपदावर संदेश नामदे यांची निवड झाली असून त्यांचा पदग्रहण सोहळा २१ जुलै रोजी पार पडला.

अंबरनाथच्या हॉटेल कृष्णा पॅलेस येथे संपन्न झालेल्या पदग्रहण सोहळ्याला रोटरीचे डीजीएन डॉ. निलेश जयवंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यातंच्या उपस्थितीत मावळते अध्यक्ष सुरेश अय्यर यांनी संदेश नामदे यांना अध्यक्षपदाची सूत्रे सुपूर्द केली.

त्याचवेळी पुढील वर्षाची कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली. त्यात सचिव म्हणून ॲड. भूषण कोतेकर, खजिनदार म्हणून अथर्व राणे आणि आयपीपी सुरेश अय्यर, निखील चौधरी, गणेश किणीकर, मयूर कोठारी, शशांक ओटारी, राजू पुरी, मनोहर पवार आणि नरेंद्र पवार हे काम करणार आहेत.

या पदग्रहण सोहळ्याच्या वेळी प्रीतपालसिग भाटीया, सर्जेराव सावंत, देवराम गागरे हरप्रीतसिंह भाटीया आदि मान्यवरही उपस्थित होते.